# PROFIT ADVERTISERS (INDIA) Pvt. Ltd.

| | PRESS CLIPPING | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Client | Agrovision [3rd Day] | | | | |
| Publication | Lokmat | | | | |
| Language | Marathi | Place | Nagpur | Date | 14/11/16 |

# 'ॲग्रोव्हिजन' शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक

**उत्तम प्रतिसाद : नवीन संशोधनाने तया**

नागपूर : रेशीमबाग मैदान येथे सुरु असलेले 'ॲग्रोव्हिजन' राष्ट्रीय कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरत आहे. विविध राज्यांतील शेतकरी प्रदर्शनाला भेट देऊन नवीन संशोधनाने तयार वाणांची माहिती घेत आहेत. प्रदर्शनात शासकीय विभाग, लघु उद्योजक, कृषी विद्यापीठे, संशोधन संस्था व बहुराष्ट्रीय कंपन्यांचे स्टॉल्स आहेत. प्रत्येक स्टॉलवर शेतकऱ्यांसाठी उपयोगी ठरणारे बरेच काही उपलब्ध आहे. हे प्रदर्शन उद्या, सोमवारपर्यंत चालणार आहे.

## एक किलोचे सीताफळ



◆ सीताफळे आवडत नाहीत अशी व्यक्ती विरळच. आपल्यापैकी बरेचजण लहानपणापासून सीताफळे खात आले आहेत. यामुळे आपण सीताफळांशी चांगलेच परिचित आहोत. या फळाचा दोन्ही हातात मावणार नाही असा आकार आपण कधीही पाहिला नाही. परंतु, हिंगणा तालुक्यातील एका शेतकऱ्याने संशोधित वाणाच्या संगोपनात स्वत:चे परिश्रम ओतून चमत्कार करुन दाखवला आहे. त्यांच्या शेतातील वाणाला तब्बल १ किलो व त्यापेक्षाही जास्त वजनाची सीताफळे लागली आहेत. ही सीताफळे 'ॲग्रोव्हिजन'मध्ये आलेल्या शेतकऱ्यांसाठी कुतूहलाचा विषय ठरत आहेत. 'ॲग्रोव्हिजन'मध्ये या सीताफळांचा स्टॉल लावण्यात आला आहे. विठ्ठलदास मनियार असे हा चमत्कार करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव असून ते मांडव घोराड येथील रहिवासी आहेत. त्यांनी या सीताफळाची रोपेही विक्रीसाठी ठेवली आहेत. अनेक शेतकरी ही रोपे खरेदी करीत आहेत.

## वांगी वेधतात लक्ष



◆ वांगी आकाराने किती मोठी असावीत याचा विचार कुणी केला आहे काय? नाही ना! कारण हा विचार डोक्यात यायला कोणते निमित्तच आपल्याला मिळाले नाही. बाजारात गेल्यानंतर रोज पाहतो त्याच आकाराची वांगी दिसतात. यामुळे वांग्यांविषयी नवल वाटण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. परंतु, 'ॲग्रो व्हिजन'मध्ये अशी वांगी आहेत जी तुम्हाला तोंडात बोटे घालायला लावतील. ही वांगी आकाराने दुधी भोपळ्याएवढी आहेत. वांग्यांचा रंग जांभळा आहे. इंजा बारको असे या वाणाचे नाव आहे. वर्धा जिल्ह्यातील आमगाव (ता. सेलू) येथील शेतकरी अभय शिंगाडे यांनी हे वाण यशस्वीरीत्या पिकवले आहे. या वांग्यांच्या उत्पादनातून शिंगाडे यांचा चांगला आर्थिक फायदा झाला आहे. ही वांगी 'ॲग्रोव्हिजन'मध्ये येणाऱ्या शेतकऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहेत.

## भरिताची वांगी अव्वल



◆ संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना सधन मानले जाते. परंतु, एका शेतकऱ्याला हे बिरुद मान्य नाही. त्याला संत्र्यापेक्षा वांगीच अव्वल वाटत आहेत. यामागे कारणही तसेच आहे. या शेतकऱ्याला संत्र्याच्या लहरी पिकाने व बाजारात मिळणाऱ्या भावाने दगा दिला आहे. यामुळे त्याने वांग्यांना जवळ केले आहे. एकदा जळगाव येथे आयोजित कृषी प्रदर्शनाला भेट देण्यासाठी गेल्यानंतर त्याला भरिताच्या चविष्ट वांग्याच्या वाणाची माहिती मिळाली. या वाणाचे त्याने स्वत:च्या शेतात उत्पादन घेतले व चांगला फायदा झाला. या वाग्यांना बाजारात मोठी मागणी आहे. यामुळे या शेतकऱ्याला वांगी प्रिय झाली नितीन राऊत असे शेतकऱ्याचे नाव असून ते नरखेड तालुक्यातील रहिवासी आहेत. त्यांच्याकडे ती शेती आहे.

## लांबच लांब चवळी



◆ अडीच फूट लांब चवळीची शेंग कधी पाहिली आहे काय उत्तर नकारार्थी असेल तर, लगेच 'ॲग्रो व्हिजन' प्रदर्शन गाठा तुम्हाला पहायला मिळेल जपानी लाल दाणा वाणाची लांब चवळीची शेंग. देवीदास चिकटे या तज्ज्ञाने दिलेल्या माहित या वाणाच्या चवळीचे एकरी ४०० ते ५०० क्विंटल उत्पाद नागपूर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी या वाणाची लागवड आहे. प्रत्येकाचा प्रतिसाद चांगला आहे. ही चवळी खायला आहे. एवढी लांब चवळीची शेंग पाहून 'ॲग्रो व्हिजन'मध्ये आलेल्या अनेक शेतकऱ्यांनी या वाणाची घेतली. ही चवळी म्हणजे आधुनिक तंत्रज्ञानाने कृषी क्षेत्रात केलेल्या क्रांतीचे एक प्रतिक आहे.